**<u>ठळक बातम्या</u>**

- अमेरिकी राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प पुन्हा विजयी
- महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीसाठी मुख्यमंत्र्यांकडून महायुतीच्या १० वचनांची घोषणा
- विधानसभा निवडणुकीसाठीचा राष्ट्रवादी काँग्रेसचा जाहीरनामा प्रसिद्ध
- इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी संरक्षणमंत्री योव गॅलंट यांना पदावरून हटवलं

  **आणि**

- मनदीप जांगराने पटकावलं जागतिक बॉक्सिंग महासंघाच्या स्पर्धेचं विश्वविजेतेपद

**<><><><><>**

अमेरिकी राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प पुन्हा विजयी झाले आहेत. राष्ट्राध्यक्षपदासाठी आवश्यक असलेली ५३८ पैकी २७० इलेक्टोरल मतं मिळवण्यात ते थोड्याच वेळापूर्वी यशस्वी ठरले. J D वान्स हे त्यांच्या पक्षाचे उपाध्यक्ष पदाचे उमेदवार आहेत. फॉक्स न्यूजनं दिलेल्या वृत्तानुसार ट्रम्प यांना २७७ तर डेमोक्रेटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांना २२६ इलेक्टोरल मतं मिळाली आहेत. अजून ३५ मतांची मोजणी शिल्लक आहे. एकूण ३१५ मतं मिळवू असा विश्वास ट्रम्प यांनी व्यक्त केला आहे.

तीन वेळा निवडणूक लढवून २ वेळा जिंकण्याचा विक्रम त्यांच्या नावावर जमा झाला आहे. यापूर्वी २०१६ ते २०२० मध्ये ते अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. त्यानंतर २०२० मध्ये झालेल्या निवडणुकीत ज्यो बायडेन यांनी त्यांना पराभूत केलं होतं.

अमेरिकेचं सुवर्णयुग आता सुरू झालं असून पुन्हा अमेरिकेला महान करण्यासाठी हा विजय झाल्याचं ट्रम्प यांनी आपल्या समर्थकांना संबोधित करताना सांगितलं. असा विजय यापूर्वी कधीही झालेला नव्हता. हा अमेरिकी नागरिकांचा विजय आहे. रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत तुमच्यासाठी, तुमच्या कुटुंबासाठी आणि तुमच्या भविष्यासाठी लढत राहणार असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल कोल्हापूर इथल्या सभेत विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा प्रारंभ केला. या सभेत त्यांनी १० वचनांची घोषणा केली. यात लाडक्या बहिणींना एकविसशे रुपये, शेतकऱ्यांना कर्जमाफी, शेतकरी सन्मान योजनेत १५ हजार रुपये, प्रत्येकाला अन्न आणि निवारा, वृद्ध पेन्शनधारकांना एकविसशे रुपये, २५ लाख रोजगार निर्मिती तसंच अंगणवाडी आणि आशा सेविकांना १५ हजार रुपये वेतन, वीज बिलात ३० टक्के कपात अशा वचनांचा समावेश आहे. या सभेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित होते.

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या मासिक रकमेत ६०० रुपयांची वाढ करून पात्र महिलांना २१०० रुपये देण्याचं आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसनं आपल्या जाहीरनाम्यात दिलं आहे. विधानसभा निवडणुकीसाठीचा राज्यव्यापी जाहीरनामा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज मुंबईत प्रसिद्ध केला. तसंच या निवडणुकीत पक्ष लढवत असलेल्या मतदारसंघांपैकी ५० मतदारसंघांचे स्वतंत्र जाहीरनाम्यांच्या सारांश पुस्तिकेचं प्रकाशनही त्यांनी केलं. आपापल्या मतदारसंघांचा जाहीरनामा जाणून घेण्यासाठी टोल-फ्री क्रमांकही तटकरे यांनी जाहीर केला.

अजित पवार यांनी बारामतीतून या मतदारसंघासाठीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. बारामतीला देशातलं सर्वात आदर्श आणि प्रगत तालुका बनवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं. बारामतीत राज्यातली पहिली जागतिक दर्जाची क्रीडा अकादमी उभारणं, किमान आधारभूत मूल्याधारित अन्नप्रक्रिया केंद्रांची साखळी निर्माण करून रोजगारनिर्मिती, लॉजिस्टिक पार्कची निर्मिती, बारामतीला भारतातलं पहिलं सौरऊर्जा शहर बनवणं, कर्करोग रुग्णालय उभारणं या वचनांचा समावेश या जाहीरनाम्यात आहे.

**<><><><><>**

भारतीय जनता पक्ष आणि महायुतीच्या उमेदवारांविरोधात बंडखोरी केल्यानं भाजपनं राज्यभरातील आपल्या चाळीस पदाधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. पक्षशिस्त आणि अनुशासन भंग केल्यामुळे ही कारवाई करण्यात येत असल्याचं पक्षानं आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

जल व्यवस्थापन, संवर्धन आणि शाश्वतता याबाबत जागरूकता आणि संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारतर्फे आजपासून पंधरा दिवसांचा जल उत्सव साजरा करण्यात येत आहे. नीती आयोगातर्फे या उपक्रमाचं उद्घाटन आज करण्यात आलं. राष्ट्रीय जल जीवन मिशन, पेयजल आणि स्वच्छता विभाग आणि जल शक्ती मंत्रालयाच्या सहकार्यानं ही मोहिम राबवण्यात येत आहे. वीस राज्यांमध्ये राबवण्यात येणाऱ्या या मोहिमेत जलस्त्रोतांचे संवर्धन आणि संरक्षण यासाठी नागरिकांनी एकत्रितपणे काम करण्यावर भर देण्यात येणार आहे. पाण्याचा वापर आणि पाणी व्यवस्थापन सक्षम करण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी करून घेतलं जाणार आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज यवतमाळ जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्दरामय्या आज मुडा घोटाळ्याप्रकरणी मैसुरूमधल्या लोकायुक्त पोलिसांसमोर हजर झाले. मैसुरू विकास प्राधिकरणानं याप्रकरणी सिद्दरामय्या, त्यांची पत्नी आणि इतरांच्या विरोधात फसवणूक, भ्रष्टाचार आदी गुन्हे दाखल केले आहेत. याप्रकरणात मिळालेली जमीन ईडीच्या तक्रारीनंतर सिद्दरामय्या यांच्या पत्नीनं परत केली आहे. दरम्यान, याप्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी करणारी याचिका कर्नाटक उच्च न्यायालयात दाखल केली आहे. याप्रकरणी न्यायालयानं लोकायुक्तांकडून सद्यस्थिती अहवाल मागवला आहे.

**<><><><><>**

इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी संरक्षणमंत्री योव गॅलंट यांना पदावरून हटवलं आहे. नेतन्याहू यांनी गॅलंट यांच्यावर इस्त्रायल कॅबिनेटच्या विरोधात निर्णय घेतल्याचा आणि अप्रत्यक्षपणे इस्त्रायलच्या शत्रूंना मदत केल्याचा आरोप केला आहे. गॅलंट यांच्या जागी परराष्ट्रमंत्री इस्त्रायल काट्झ यांची नियुक्ती करण्यात आली आहे तर गिदोन सार परराष्ट्र मंत्री म्हणून पदभार स्वीकारतील. या घोषणेमुळे इस्त्रायलमध्ये निदर्शनं सुरू झाली असून देशांतर्गत तणाव वाढला आहे.

**<><><><>**

भारतीय बॉक्सर मनदीप जांगरा यानं जागतिक बॉक्सिंग महासंघाचं सुपर फेदरवेट विश्वविजेतेपद पटकावलं आहे. त्यानं काल ब्रिटनच्या कोनोर मॅकिन्टोशचा १०-० असा पराभव केला. मनदीप कोणत्याही प्रो-बॉक्सिंग प्रकारात विश्वविजेता होणारा पहिला भारतीय बॉक्सर ठरला आहे.

**<><><><>**

आगामी IPL चे लिलाव २४ आणि २५ नोव्हेंबरला सौदी अरेबियातल्या जेद्दाहमध्ये होणार आहेत. BCCI ने काल ही घोषणा केली. ११६५ भारतीय आणि ४०९ परदेशी असे एकूण १ हजार ५७४ खेळाडू या लिलावात सहभागी होणार आहेत. प्रत्येक फ्रँचाइसीला एकूण २५ खेळाडू निवडता येतील. सुमारे साडे सहाशे कोटी रुपयांची उलाढाल यंदा होण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

कृषी क्षेत्राला विना अडथळा कर्ज देण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे निर्देश केंद्र सरकारनं दिले आहेत. यासंदर्भात सर्व सरकारी बँका, नाबार्ड आणि राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत केंद्रीय वित्त सेवा सचिव एम. नागाराजू यांनी हे निर्देश दिले. या कर्जवितरणासाठी दिलेली उद्दिष्ट चालू आर्थिक वर्षात पूर्ण होतील, याची खबरदारी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

**<><><><>**

तेलंगणातल्या नागरिकांचं सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, नोकरीविषयक आणि जातनिहाय सर्वेक्षण आजपासून सुरू झालं. घरोघरी जाऊन ही माहिती गोळा करण्यासाठी १ लाखाहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. राज्य नियोजन आयोगाच्या अखत्यारीत महिनाअखेरपर्यंत हे सर्वेक्षण चालणार आहे. गेल्यावर्षी

झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसनं जातिनिहाय जनगणना करण्याचं आश्वासन दिलं होतं.

**<><><><><>**

मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या कामादरम्यान काल ३ काँक्रीटचे ब्लॉक कोसळल्यानं ३ मजुरांचा मृत्यू झाला आणि १ जण जखमी झाला. आनंद जिल्ह्यात माही नदीवर बनवण्यात येणाऱ्या पुलासाठी हे ब्लॉक वापरले जात होते.मृतांच्या वारसांना २० लाख रुपयांची मदत दिली आहे. याप्रकरणाची तांत्रिक चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**<><><><><>**

मध्य प्रदेशात बांधवगड व्याघ्र प्रकल्पात १० जंगली हत्तींचा मृत्यू झाला होता. हत्तींनी मोठ्या प्रमाणात खराब झालेली कोडो वनस्पती खाल्ल्यानं त्यांचा मृत्यु झाल्याचं अहवालात म्हटलं आहे. नमुन्यांमध्ये सायक्लोपियाझोनिक आम्ल आढळून आलं असल्याचं वनसंरक्षक अधिकार्यांनी  सांगितलं.

**<><><><><>**

बांदिपोरामध्ये सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एक दहशतवादी ठार झाला आहे. उत्तर काश्मीरमधील बंदिपोराच्या जंगलात दहशतवादी लपल्याची माहिती सुरक्षा दलांना मिळाल्यानंतर काल रात्री लष्कर, जम्मू-काश्मीर पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या जवानांनी संयुक्त मोहिम सुरू केली. लपलेल्या दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केल्यानंतर जवानांनी त्यांना प्रत्युत्तर दिलं. अजूनही चकमक सुरू आहे.

**<><><><><>**

बिहारमधल्या लोकप्रिय गायिका शारदा सिन्हा यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात उद्या पाटणा इथं अंत्यसंस्कार होणार आहेत. नवी दिल्लीतल्या एम्समध्ये काल रात्री त्यांचं निधन झालं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. शारदा सिन्हा यांची मैथिली आणि भोजपुरी लोकगीते गेल्या अनेक दशकांपासून खूप लोकप्रिय आहेत, असं प्रधानमंत्री म्हणाले.श्रद्धेचे महान पर्व असणाऱ्या छठ या सणाशी संबंधित त्यांची सुमधुर गाणी नेहमीच स्मरणात राहतील, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

छटपूजा उत्सवाचा आज दुसरा दिवस असून त्यासाठी बिहारमध्ये सुरक्षा व्यवस्था कडेकोट करण्यात आली आहे. आज खरना विधी होणार आहे. सूर्य आणि छटी मैय्या यांची पूजा केल्यानंतर भाविक खीर आणि रोटी यांचं सेवन करतील आणि खरनानंतर 36 तास उपवास पाळला जाईल. विविध घाटांवर भाविकांची मोठी गर्दी झाली आहे. नद्यांच्या किनाऱ्यांवर राष्ट्रीय आपत्ती निवारण दल आणि राज्य आपत्ती निवारण दलाचे जवान तैनात करण्यात आले आहेत.